# F.Y.B.A

# SEM-I

# भारतीय अर्थव्यवस्था – २

## प्रात्यक्षिक

## भारतातील लोकसंख्या प्रकरण १

## (Population in India)

**१.१ भारताच्या लोकसंख्येची रूपरेखा**

**१.१.१ आकार आणि वृद्धी**

**१.१.१ लिंग रचना**

**१.१.३ वय रचना**

**१.१.४ लोकसंख्येची घनता**

**१.१.५ ग्रामीण-शहरी विभागणी**

**१.२ भारतीय लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी**

**१.३ आर्थिक विकासासाठी मानवी भांडवल म्हणून लोकसंख्या**

### १.० प्रास्ताविक (Introduction):

भारतातील लोकसंख्येचा आकार मोठा आहे. उच्च जनन दर आणि मृत्यू दरात वेगाने झालेली घट लोकसंख्या वाढीस कारणीभूत आहे. लोकसंख्येची वय रचना देशातील विविध वयोगटातील लोकांची संख्या दर्शवते. हे लोकसंख्येच्या सर्वात मूलभूत वैशिष्ट्यांपैकी एक आहे. कोणत्या भागात किंवा प्रदेशात लोकसंख्येची दाटी आहे किंवा लोकसंख्या विरळ आहे हे समजण्यासाठी लोकसंख्येची घनता अभ्यासणे आवश्यक असते. देशातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शहरीकरणात वाढ होत असते. त्यातून शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येत वाढ होते. देशातील लोकसंख्येची माहिती घेत असताना शहरी भागात लोकसंख्या किती आहे व ग्रामीण भागात ती किती आहे, याची माहिती घेणे आवश्यक ठाते. मानवी भांडवल आणि आर्थिक विकास एकमेकांशी संबंधित आहेत. मानवी भांडवल आर्थिक विकासावर प्रभाव टाकते, शिक्षित, कुशल, ज्ञानी व आधुनिक दृष्टिकोन असलेली लोकसंख्या किंवा मानवी भांडवल आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. प्रस्तुत प्रकरणात भारताच्या लोकसंख्येची रूपरेखा आकार व वृद्धी, लिग रचना, वय रचना, लोकसंख्येची धरता, ग्रामीण-शहरी विभागणी, भारतीय लोकसंख्येची व्यावसायिक विभागणी आणि आर्थिक विकासासाठी मानवी भांडवल म्हणून लोकसंख्या याविषयी स्पष्टीकरण दिले आहे.

### १.१ भारताच्या लोकसंख्येची रूपरेखा : (Demographic Profile of India)

भारतातील लोकसंख्येचा आकार मोठा आहे. भारतातील लोकसंख्येने १४० कोटींचा आकडा ओलांडलेला आहे. संयुक्त राष्ट्रसंघ (United Nations) अंदाजानुसार २०२३ मध्ये भारताची लोकसंख्या १४२.८६ कोटी आणि जगाची लोकसंख्या ८०४.५० कोटी होती. याचाच अर्थ जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७.७ टक्के लोकसंख्या आणि जगातील भूमीच्या एकूण क्षेत्रफळापैकी २.४ टक्के भू-भाग भारतात आहे. लोकसंख्येच्या आकारावरून जगात भारताचा क्रमांक पहिला लागतो.

### **१.१.१ आकार आणि वृद्धी (Size and Growth):**

भारतात पहिली जनगणना १८७२ मध्ये करण्यात आली. मात्र, १८८१ पासून प्रत्येक दहा वर्षांनी नियमितपणे जनगणना करण्यात येत आहे. या जनगणनेतून मिळालेल्या लोकसंख्याविषयक आकडेवारीच्या आधारे भारतातील लोकसंख्येचा आकार १९५१ नंतराच्या काळात कशा प्रकारे बदलत गेला, याची माहिती तक्ता १.१ च्या आधारे घेता येईल. या तक्त्यात १९५१ ते २०११ या काळातील भारताची लोकसंख्या व लोकसंख्या वाढीचा वेग याविषयी माहिती दिली आहे.

**तक्ता १.१ : भारतातील लोकसंख्या (१९५१ ते २०११)**

| अ.क्र | जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटींमध्ये) | लोकसंख्या वाढीचा वार्षिक सरासरी दर |
|---|---|---|---|
| १ | १९५१ | ३६.१ | - |
| २ | १९६१ | ४३.९ | १.९६ |
| ३ | १९७१ | ५४.८ | २.२० |
| ४ | १९८१ | ६८.३ | २.२२ |
| ५ | १९९१ | ८४.६ | २.१४ |
| ६ | २००१ | १०२.८ | १.९५ |
| ७ | २०११ | १२१.० | १.७६ |

**स्त्रोत :** (Government of India, India 2013, P. 8)

तक्ता १.१ मध्ये १९५१ ते २०११ या काळातील भारताची लोकसंख्या आणि लोकसंख्येचा वार्षिक वृद्धी दा दिलेला आहे. त्यावरून पुढील बाबी स्पष्ट होतात.

१) १९५१ ते २०११ या काळात भारताच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ होत गेली. या काळात लोकसंख्येत ३६.१ कोटीवरून १२१.० कोटीपर्यंत म्हणजेच तीन पटीपेक्षा जास्त वाढ झाली.

२) भारताच्या लोकसंख्येच्या १९५१ ते २०११ या या काळातील मोठ्या वृद्धी दरामुळे लोकसंख्या वेगाने वाढली १९५१ ते १९८१ या काळात वृद्धी दर वाढत गेला आहे, वार्षिक वृद्धी दर १९५१-१९६१ या दशकात १.९६. १९६१-१९७१ या दशकात २.२० आणि १९७१-१९८१ या दशकात २.२२ होता. त्यानंतर वृद्धी दरात घट झाली. बार्षिक वृद्धी दर १९८१-१९९१ वा २.१४, १९९१-२००१ या दशकात १.१५ आणि २००१-२०११ या दशकात १.७६ होता. लोकसंख्येचा सर्वात जास्त वृद्धी दर १९७१-१९८१ या दशकात आणि सर्वात कमी वृद्धी दर २००१-२०११ या दशकात होता.

भारताच्या लोकसंख्येसंबंधी अंकटाड हँडबुक ऑफ स्टॅटिस्टिक्स २०२३ मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार जुलै २०२२ मध्ये भारताची लोकसंख्या १४१.७ कोटी होती आणि २०१७-२२ या काळातील वार्षिक वृद्धी दर ०.९ टक्के होता.

अ) **जनन दर (Birth Rate) आणि मृत्यू दर (Death Rate)**

भारताच्या लोकसंख्येत १९५१ नंतरच्या काळात जी वाढ घडून आली ती समजून घेण्यासाठी भारतातील जनन दर व मृत्यू दर याची व यातील बदलाची माहिती घेणे आवश्यक आहे. दर हजार लोकांमागे प्रतिवर्षी जन्मणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे जनन दर होय, तर प्रतिवर्षी दर हजार लोकसंख्यामागे मृत्यू पावणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यू दर होय. भारतातील जनन दर जास्त आहे, तर मृत्यू दर हा तुलनेने फारच कमी आहे. उच्च जनन दर व वेगाने घटणारा मृत्यू दर हे भारतीय लोकसंख्येचे महत्त्वपूर्ण असे वैशिष्ट्य आहे. लोकसंख्यावाढीचे मूळ हे उच्च जनन दरात आहे. १९५१ ते २००० या काळात भारतातील जनन दरात व मृत्यू दरात मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात जनन दर व मृत्यू दर यात कशाप्रकारे बदल झाला हे तक्ता १.२ मध्ये दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होईल.

तक्ता १.२ : भारतातील जनन दर व मृत्यू दर (१९५१–२०१७)

| वर्षे | जनन दर (प्रति १०००) | मृत्यू दर (प्रति १०००) |
|---|---|---|
| १९५१ | ३९.९ | २७.४ |
| १९६१ | ४१.७ | २२.८ |
| १९७१ | ३६.९ | १४.९ |
| १९८१ | ३३.९ | १२.५ |
| १९९१ | २९.५ | ९.८ |
| २००१ | २५.४ | ८.४ |
| २०११ | २२.१ | ७.२ |
| २०१३ | २१.४ | ७.० |
| २०१५ | २०.८ | ६.५ |
| २०.२ | २०.२ | ६.३ |
| २०२० | १९.५ | ६.० |

स्रोत : (Government of India : Economic Survey 2022-23 Page 167 and earlier issues.)

तक्ता १.२ मध्ये १९५१ ते २०२० या काळातील जनन दर मृत्यू दर यात झालेला बदल दर्शविला आहे. १९५१ मध्ये जनन दर ३९.९ होता. त्यात वाढ होऊन पुढे तो १९६१ मध्ये ४१.७ एवढा झाला. त्यानंतर जनन दरात सातत्याने घट झालेली दिसते. २०२० मध्ये जनन दर १९.५ एवढा होता.

१९५१ ते २०२० या काळात मृत्यू दरात जनन दरापेक्षा अधिक वेगाने घट झालेली दिसते. १९५१ मध्ये मृत्यू दर २७.४ होता. त्यात सातत्याने घट होऊन २०२० मध्ये तो ६.० पर्यंत खाली आला. उच्च जनन दर आणि मृत्यू दरात वेगाने झालेली घट लोकसंख्या वाढीस कारणीभूत आहे. त्यामुळे भारतातील लोकसंख्यावाढीची कारणमीमांसा देताना उच्च जनन दराची व मृत्यू दर घटण्याची कारणे पाहणे आवश्यक आहे.

ब) भारतातील उच्च जनन दराची कारणे :

भारतातील जनन दर उच्च आहे व लोकसंख्या वाढीस हा उच्च जनन दर कारणीभूत आहे. १९५१ ते २०२० या काळात जनन दरात घट झालेली आहे. मात्र, अजूनही जनन दर खूपच जास्त आहे. भारतातील उच्च जनन दराची कारणे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) विवाहाची सार्वत्रिकता :

भारतात विवाह करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे प्रमाण प्रगत देशाच्या तुलनेत खूपच मोठे आहे. भारतातील फारच थोडे स्त्री-पुरुष विवाह न करता तसेच राहतात असे दिसते. विवाह करणे हे सामाजिक दृष्टीने आवश्यक मानले जात असल्याने बहुतेक सर्वजण विवाह करतात. त्यामुळे लोकसंख्येत वाढ घडून येत राहते.

२) बालविवाह :

कमी वयात विवाह होणाऱ्या स्त्री-पुरुषांचे प्रमाण भारतात मोठे आहे. अल्पवयीन मुलींच्या विवाहाचे प्रमाण कमी होत असले तरी १८ वर्षे पूर्ण होताच मोठ्या प्रमाणावर मुलींचे विवाह होतात. कमी वयात विवाह होत असल्याने प्रजोत्पादनासाठी मोठा काळ उपलब्ध होऊन लोकसंख्येत वेगाने वाढ होते.

३) उष्ण हवामान :

भारतातील हवामान उष्ण आहे व त्याचाही परिणाम जनन दरावर झालेला दिसतो. उष्ण हवामानामुळे मुले-मुली लवकर वयात येतात आणि वयात आल्यानंतर लगेचच त्यांचे विवाह होतात. साहजिकच त्यांच्याकडून फार मोठा काळ लोकसंख्येत भर टाकली जाते.

४) दारिद्र्याचे मोठे प्रमाण :

भारतात दारिद्र्याचे प्रमाण फार मोठे होते व आजही. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. गरीब लोकांना मुले ही संपत्ती वाटतात. मुले जास्त असतील तर ती शेतीतील कामे किंवा इतर कामे करण्यास उपयोगी पडतील म्हणून मुलांना जन्माला घालण्याचे प्रमाण जास्त असते.

५) रूढी, परंपरांचा पगडा :

भारतीय समाज हा परंपरावादी आहे. या समाजातील लोकांवर रूढी, परंपरा, धर्म, अंधश्रद्धा यांचा पगडा आहे. घराण्याची परंपरा चालू ठेवण्यासाठी म्हणजेच वंश टिकविण्यासाठी मुलगा जन्माला येण्याचा अट्टाहास धरला जातो. कितीही मुली झाल्या तरी मुलगा होईपर्यंत मुली होऊ दिल्या जातात. त्यामुळेही जनन दर उच्च राहिलेला आहे.

६) एकत्र कुटुंब पद्धती :

भारतातील जनन दर जास्त असण्यास एकत्र कुटुंब पद्धतीही जबाबदार आहे. एकत्र कुटुंबात मुलं सांभाळण्याची अडचण नसते. त्यामुळे अधिक मुले जन्माला घातली जातात. एकत्र कुटुंबात मुलांच्या पालन-पोषणाची जबाबदारी सामुदायिकरीत्या घेतली जात असल्याने अधिक मुले जन्माला घातली जात असल्याचे दिसते.

७) परिणामकारक नियंत्रणाचा अभाव :

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या नियंत्रणासाठी ज्या योजना व कार्यक्रम शासकीय पातळीवर आखले व राबविले गेले ते परिणामकारक नसल्याने जनन दरात फार वेगाने घट होऊ शकली नाही. लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाकडे पुरेशा गांभीर्याने पाहिले गेले नाही.

८) कुटुंब नियोजन कार्यक्रमाला मर्यादित प्रतिसाद :

देशात लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम राबविला गेला. मात्र, याला मिळालेला प्रतिसाद मर्यादित होता. याउलट हा कार्यक्रम बदनाम झाला. त्यानंतर कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यात आला; पण त्यालाही पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कुटुंबाचा आकार लहान ठेवण्याच्या बाबतीत यश आले नाही.

९) निरक्षरतेचे मोठे प्रमाण :

जनन दरावर शिक्षणाचाही परिणाम होतो. विवाहित जोडप्याला मिळालेले शिक्षण व त्यांनी जन्माला घातलेल्या मुलांची संख्या यामध्ये व्यस्त संबंध असल्याचे आढळते. भारतात निरक्षतेचे प्रमाण जास्त असल्याने व विशेषतः स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे जनन दर जास्त आहे.

१०) राहणीमानाची निकृष्ट पातळी :

निकृष्ट राहणीमान व जनन दर यामध्ये सहसंबंध असल्याचे शास्त्रीय दृष्टिकोनातून सिद्ध झाले आहे. लोकांची जीवनमानाची पातळी जेवढी उच्च तेवढी जनन क्षमता कमी असते, असे दिसते. भारतात दारिद्य मोठ्या प्रमाणाबर आहे. त्यामुळे येथील बहुसंख्य लोकांची राहणीमानाची पातळी निकृष्ट दर्जाची आहे. त्यामुळे भारतातील जनन दर जास्त आहे.

क) मृत्यू दर घटण्याची कारणे :

भारतात जनन दर उच्च पातळीवर राहिलेला आहे. मात्र, मृत्यू दरात वेगाने घट घडून आली आहे. उच्च जनन दर व घटता मृत्यू दर लोकसंख्या वाढीस जबाबदार आहे. जनन दरात झालेल्या घटीपेक्षा मृत्यू दरात अतिशय वेगाने घट झाली. मृत्यू दरात वेगाने घट होण्यास जबाबदार असणाऱ्या कारणांची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

१) आरोग्यविषयक सुविधात वाढ :

स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील आरोग्यविषयक सेवा-सुविधात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. खेडोपाडी सरकारी दवाखाने सुरू करण्यात आले. त्याचबरोबर खासगी आरोग्य सेवेचा प्रसार शहरांबरोबरच ग्रामीण भागातही झाला. त्यामुळे मृत्यू दरात घट झाली.

२) दुष्काळी परिस्थितीवर नियंत्रण :

पूर्वी सातत्याने दुष्काळ पडत असत. त्यात अन्न-पाण्याअभावी लक्षावधी लोक मृत्युमुखी पडत; परंतु अलीकडील काळात वाहतूक व दळणवळण साधनांची प्रगती झाल्याने या दुष्काळावर मात करणे शक्य झाले आहे. तसेच जलसिंचन सुविधात वाढ झाल्याने दुष्काळाचे प्रमाणही कमी झाले आहे. त्यामुळे मृत्यू दरात घट झालेली दिसते.

३) साथीच्या रोगांवर नियंत्रण :

प्लेग, देवी, कॉलरा यांसारख्या रोगांमुळे पूर्वी अनेक लोक मृत्युमुखी पडत; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात अनेक रोगांवर प्रभावी औषधे निर्माण झाल्याने साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. देवीसारख्या रोगांवर पूर्ण नियंत्रण मिळविणे शक्य झाले आहे.

४) पूरनियंत्रण :

दुष्काळाप्रमाणेच महापुरातही पूर्वी हजारो लोक मृत्युमुखी पडत; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या धरणांची निर्मिती झाल्याने, तसेच छोटी धरणे, पाझर तलाब यांची वाढ झाल्याने पुराचे प्रमाण व तीव्रता कमी झालेली आहे. त्याचबरोबर पुरात सापडलेल्या पूरग्रस्तांना वाहतूक व दळणवळण साधनात प्रगती झाल्याने मदत प्रभावीपणे करता येते. पुरामुळे मृत्यू पावणाऱ्याच्या संख्येत त्यामुळे घट झाली आहे.

५) बालमृत्यूच्या प्रमाणात घट :

स्वातंत्र्योत्तर काळात मृत्यू दरात वेगाने घट होण्यास बालमृत्यूच्या प्रमाणात झालेली घटही जबाबदार आहे. पूर्वी जन्माच्या वेळी किंवा बालवयात मृत्यू पावणाऱ्या बालकांची संख्या मोठी होती; परंतु अलीकडील काळात बाळंतपणाच्या काळात स्त्रियांना मिळणाऱ्या आरोग्यविषयक सुविधा, आरोग्यविषयक माहितीचे प्रसारण, बालकांना होणाऱ्या आजारावर प्रभावी औषधांची निर्मिती, त्यांना मिळणाऱ्या पोषक आहारात सुधारणा यांसारख्या कारणांमुळे बालमृत्यूच्या प्रमाणात घट झालेली आहे.

६) बाळंतपणातील स्त्रियांच्या मृत्यूत घट :

पूर्वी बाळंतपणात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडत. बाळंतपणात योग्य त्या सुविधा, औषधोपचार न मिळाल्याने स्त्रियांचे बाळंतपणात मृत्यू होत होते; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात कुटुंब कल्याण, माता व बालसंगोपन यासारख्या

कार्यक्रमातून आरोग्य सेवेत वाढ करण्यात आली. गरोदरपणात स्त्रियांना आवश्यक असलेल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यांना योग्य आहार मिळत आहे. त्यामुळे बाळंतपणात होणारे स्त्रियांचे मृत्यू कमी झाले आहेत.

७) वाहतूक व दळणवळण साधनांची प्रगती :

विज्ञान व तंत्रज्ञान यामधील प्रगतीमुळे वाहतूक व दळणवळण साधनात देशात मोठ्या प्रमाणावर प्रगती झालेली आहे. आरोग्यविषयक सेवेत सुधारणा, आरोग्यविषयक माहितीचे प्रसारण, पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त यांना मिळणाऱ्या मदतीत सुधारणा वगैरे गोष्टी घडून आल्या आहेत. त्यामुळे मृत्यू दरात घट घडून येण्यास मदत झाली आहे.

८) शिक्षणाचा वाढता प्रसार:

मृत्यू दरात घट होण्यास देशातील शिक्षण क्षेत्राची झालेली प्रगतीही कारणीभूत आहे. शिक्षणामुळे लोकांच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे. आजारपणात देवऋषी, गंडेदोरे याच्यामागे लागून मृत्यू ओढवून घेण्याचे प्रमाण कमी झाले आहे. आजाराची कारणे, त्यावरील उपाय यांची माहिती लोकांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे मृत्यू दरात घट होत आहे.

९) आयुमयदित वाढ :

स्वातंत्र्योत्तर काळात देशात आर्थिक प्रगती घडून आली. त्यामुळे अन्नधान्ये व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेत सुधारणा घडून आली. त्याचबरोबर आरोग्य सुविधात वाढ, आहारात सुधारणा बगैरे गोष्टीही घडून आल्या. त्यामुळे लोकांच्या सरासरी आयुर्मयदित वाढ झाली. १९५१ ते १९६१ या दशकात सरासरी आयुर्मर्यादा ४१.२ वर्षे होती. १९९९-२००३ या काळात सरासरी आयुर्मर्यादा ६२.५ होती. पुरुषांच्या बाबतीत ती ६१.८ व स्त्रियांच्या बाबतीत ती ६३.५ होती. २००१ ते २०१० या दशकात पुरुषांच्या बाबतीत सरासरी आयुर्मर्यादा ६२.६ वर्षे व स्त्रियांच्या बाबतीत ६४.२ वर्षे होती. भारतात २०१४-१८ या काळात पुरूषांच्या बाबतीत आयुर्मर्यादा ६८.२ वर्षे, स्त्रियांच्या बाबतीत ७०.७ बर्षे आणि एकूण आयुर्मर्यादा ६९.४ बर्षे होती.

१०) स्वच्छ व निर्जंतुक पाणीपुरवठा :

अनेक आजारांचे मूळ हे अस्वच्छ व जंतू असलेल्या पाण्यात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात पाणीपुरवठ्याच्या सुविधात वाढ करण्यात आली. त्यामुळे स्वच्छ व निर्जंतुक पाणी लोकांना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊन पाण्यावाटे होणाऱ्या आजारात व त्यामुळे मृत्यू पावणाऱ्यांच्या संख्येत घट झाली.

बरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या लोकसंख्येत वेगाने वाढ झाली आहे. वेगाने घटणारा मृत्यू दर व उच्च जनन दर यासाठीची कारणे लोकसंख्या वाढीस जबाबदार आहेत.

### **१.१.२. लिंग रचना (Sex Composition):**

लिंग गुणोत्तर हे एक गुणोत्तर आहे जे लिंग रचना (sex composition) व्यक्त करण्यासाठी वापरले जाते. लिंग गुणोत्तर हे प्रति १००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण वर्णन करण्यासाठी वापरले जाते. भारतातील स्त्रियांची लोकसंख्या आणि भारतातं पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण काय आहे हे शोधण्यासाठी लिंग गुणोत्तर हा एक अत्यंत उपयुक्त स्त्रोत आहे. स्त्रियांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळते की नाही ते स्त्री-पुरुष प्रमाणावरून समजते. दर हजार पुरुषांमागे असणारे स्त्रियांचे प्रमाण म्हणजेच स्त्री-पुरुष प्रमाण होय. १९५१-२०११ या काळातील भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण तक्ता १.३ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता १.३ : भारतातील स्त्री–पुरुष प्रमाण (१९५१–२०११)

| जनगणना वर्ष | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|
| १९५१ | ९४६ |
| १९६१ | ९४१ |
| १९७१ | ९३० |
| १९८१ | ९३४ |
| १९९१ | ९२७ |
| २००१ | ९३३ |
| २०११ | ९४० |

स्त्रोत : Government of India : India 2012 P.7,12.

तक्ता १.३ वरून असे दिसते की, भारतातील स्त्रियांचे पुरुषांशी असलेले प्रमाण खूपच कमी आहे. १९५१ मध्ये भारतात स्त्रियांचे प्रमाण ९४६ आणि १९९१ मध्ये ९२७ होते. २००१ मध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ होते तर २०११ मध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण भारतात ९४० होते. भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणात १९५१- २०११ या काळात चढउतार झालेले आहेत. स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत एवढे कमी असणे सामाजिकदृष्ट्या योग्य नाही.

भारतात १९५१-२०११ या काळात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) दारिद्र्याचे मोठे प्रमाण :

भारतात दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आहे. आजही जवळपास १५ टक्क्यांच्या आसपास लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे. अपुऱ्या आरोग्याच्या सोयी हे कारण स्त्रियांमधील मृत्यू दर मोठा असण्यास जबाबदार आहे. दारिद्र्यामुळे स्त्रियांना योग्य आहार, चांगले आरोग्य वगैरे सुविधा उपलब्ध होत नाहीत.

२) पालन-पोषणात मुलांना महत्त्व :

कुटुंबात मुला-मुलींचे पोषण होत असताना मुलींपेक्षा मुलांना जास्त महत्त्व दिले जाते. मुलांना चांगला आहार मिळेल याची काळजी घेतली जाते. मुलींकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे मुलींची पालन-पोषणाच्या बाबतीत हेळसांड होऊन त्यांचे मृत्यूचे प्रमाण अधिक राहते.

३ ) मृत्यू दराच्या बाबतीतील विविधता :

स्त्रियांच्या मृत्यू दराच्या बाबतीत जी विविधता आढळते, ती स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी असण्यास जबाबदार आहे. गरिबांच्या बाबतीत १ वर्षाखालील बालमृत्यूचे प्रमाण मुलींच्या बाबतीत मुलांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे मुलांपेक्षा मुलींची संख्या लोकसंख्येत कमी राहून स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आहे.

४) प्रसूतीच्या काळातील स्त्रियांचे मृत्यू :

योग्य आहाराचा अभाव, औषधपाण्याची व्यवस्था न होणे यांसारख्या कारणांमुळे प्रसूतीच्या काळात होणाऱ्या स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त असलेले दिसते. १४ ते ४४ या वयोगटांत म्हणजेच जननक्षम वयात स्त्रियांमधील मृत्यूचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक आहे.

५) मुलगा-म्हातारपणाचा आधार :

मुलगी विवाह होऊन इतरांच्या घरी जात असल्याने व मुलगा मात्र आपल्या घरी राहत असल्याने म्हातारपणाचा आधार म्हणून मुलाकडे पाहिले जाते. त्यामुळे मुलाची जास्त काळजी घेतली जाते आणि मुलीची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे मुलांचा मृत्यू दर मुलींच्या तुलनेत कमी असल्याने त्याचे प्रमाण जास्त राहते.

६) बालवयात होणारे विवाह :

बालविवाहाच्या प्रथेमुळे अल्पवयीन मुलींचे विवाह केले जातात. आता त्याविरुद्ध कायदा झाला असला तरी जेमतेम १८ वर्षे पूर्ण होताच मुलीचे विवाह केले जातात. अल्पवयीन मुलींचे विवाह होत असल्याने जननक्षम वयोगटातील मुलींच्या मृत्यूचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.

७) पुरुषप्रधान समाजव्यवस्था :

भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्था असल्याने सर्वच बाबतीत स्त्रियांची हेळसांड होते. माणूस म्हणून त्यांना योग्य ते स्थान या समाजात मिळत नाही. त्यातून त्यांना योग्य राहणीमानाची पातळी मिळत नाही व त्यांची आयुर्मर्यादा कमी राहते.

८) गर्भजलपरीक्षेचा दुरुपयोग :

अलीकडील काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे गरोदरपणात गर्भाचे लिंग समजणे सोपे झाले आहे. गर्भजल परीक्षा करून गर्भाचे लिंग समजते. कायद्याने मान्य नसतानाही बेकायदेशीरपणे गर्भजल परीक्षा करून मुलगा की मुलगी हे समजून घेतले जाते. त्यातून मुलगी असल्याचे समजले, तर गर्भपात करून घेतला जातो. त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडून आणि स्त्री-पुरुष प्रमाणात असमानता निर्माण होऊन स्त्रियांच्या प्रमाणात पुरुषांच्या तुलनेत घट झाली आहे.

९) हुंड्याची अनिष्ट प्रथा :

मुलीचा विवाह करताना मुलीच्या पित्यास हुंडा द्यावा लागतो, तसेच विवाहासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. साहजिकच मुलगी जन्माला येणे म्हणजे संकट वाटते. मुलीकडे जन्मापासून दुर्लक्ष केले जाते. त्यातून मुलींमधील मृत्यूचे प्रमाण मोठे राहून स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी राहते.

अलीकडील काळात शिक्षणाबरोबर हुंड्याची प्रथा कमी होत आहे, असे वरवर दिसत असले तरी वेगळ्या मार्गाने ही प्रथा जिवंत आहे. टी. व्ही., स्कूटर, मोटार, वॉशिंग मशिन यांसारख्या वस्तू मिळण्याची अपेक्षा वधूपित्याकडून केली जाते. त्यामुळे मुलीपेक्षा मुलालाच पसंती दिली जाते.

१०) हुंडाबळी व आत्महत्या :

आजही हुंड्यासाठी स्त्रियांचा छळ केला जात असल्याचे दिसते. हुंडाबळीची प्रकरणेही सातत्याने घडताना दिसतात. नवरा, सासू किंवा सासरा यांच्याकडून छळ केला जातो, तिचा बळी घेतला जातो. कित्येकदा स्त्रिया छळाला कंटाळून आत्महत्याही करतात. त्यामुळे स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त राहून स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने अधिक असल्याचे दिसते.

**१.१.३ वय रचना (Age Composition):**

लोकसंख्येची वय रचना देशातील विविध वयोगटातील लोकांची संख्या दर्शवते. हे लोकसंख्येच्या सर्वात मूलभूत वैशिष्ट्यांपैकी एक आहे. वय रचना लोकसंख्येच्या आर्थिक मूल्याचा संदर्भ देते. ०-१४ आणि ६० वर्षांपेक्षा जास्त वयोगटाला आश्रित लोकसंख्या म्हणून ओळखले जाते, १५-६५ वर्षांच्या गटाला कार्यकारी लोकसंख्या म्हणतात. एखाद्या देशात कार्यकारी लोकसंख्येचे प्रमाण जितके जास्त असेल तितके ते अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर असते.

समाजाचे आर्थिक आणि सांस्कृतिक जीवन लोकसंख्येचे वय आणि लिंग रचना यावर मुख्यतः अवलंबून असते. शिवाय, कोणत्याही देशाची नियोजन प्रक्रिया अर्थव्यवस्था आणि संस्कृतीच्या विकासासाठी तसेच त्याच्या वैयक्तिक क्षेत्रांसाठी या आकडेवारीचा मोठ्या प्रमाणावर वापर करते. अनेक देश आणि आंतरराष्ट्रीय एजन्सी वेगवेगळ्या देशांमध्ये लिंग आणि वयानुसार लोकसंख्येच्या वितरणाचा अभ्यास करतात कारण जागतिक लोकसंख्येच्या मार्गक्रमणाच्या

बाबतीत त्याचे महत्त्व आहे. लोकसंख्येचा भविष्यातील आकार आणि रचना लोकसंख्येच्या वर्तमान वय-लिंग संरचनेवर अवलंबून असते. सर्वेक्षणाच्या वेळी व्यक्तीचे त्याच्या/तिच्या शेवटच्या वाढदिवशी असलेले वय विचारात घेतले जाते. अशा प्रकारे, लोकसंख्या शास्त्रानुसार, वर हे पूर्ण वर्ष मानले जाते. वय वितरण मुले, तरुण आणि वृद्धांची सापेक्ष संख्या दर्शवते. जवळजवळ सर्व लोकसंख्येची वैशिष्ट्ये वेगवेगळ्या वयोगटानुसार लक्षणीय बदलतात. भविष्यातील लोकसंख्या वाढ बय-लिंग रचनेवर निर्णायकपणे अवलंबून असते. लोकसंख्येचे वयोगटानुसार ०-१४ वर्षे, १५-६४ वर्षे आणि ६५ वर्षे किंवा त्यावरील असे वर्गीकरण केले जाऊ शकते. लोकसंख्यावाढीचा दर विशिष्ट वयोगटातील व्यक्तींच्या प्रमाणाने जोरदारपणे प्रभावित होतो. या वय रचनेच्या ज्ञानाने, लोकसंख्यावाढीचा अधिक अचूक अंदाज लावला जाऊ शकतो. लोकसंख्येच्या वयोगटानुसार विभागणीचा अभ्यास अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. देशातील श्रमदलाचा आकार समजण्यासाठी वयोगटानुसार विभागणी उपयुक्त ठरते.

१९६१ ते १९९१ या काळात भारताच्या एकूण लोकसंख्येतील ० ते १४ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ४१ टक्क्यांवरून ३६.५ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे, तर १५ ते ६० वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ५३.३ टक्क्यांवरून ५७.१ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. याच काळात ६० व त्यापेक्षा जास्त वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ५.७ टक्क्यांवरून ६.४ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. लोकसंख्येतील वृद्ध लोकांचे प्रमाण वाढण्यास मृत्यू दरात झालेली घट कारणीभूत आहे.

२०१८ मध्ये भारताची एकूण लोकसंख्या १३५.३ कोटी होती. तर जुलै २०२२ मध्ये लोकसंख्या १४१.७ कोटी होती. २०१८ आणि २०२२ मधील लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी तक्ता १.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १.४ : भारतातील लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी (२०१८ आणि २०२२)**

| वयोगट (वर्षे) | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|
| | २०१८ | २०२२ |
| ०-१४ | २७.१ | २५.३ |
| १५-२४ | १८.२ | १८.० |
| २५-३९ | २४.० | २४.२ |
| ४०-६४ | २४.५ | २५.६ |
| ६५-७४ | ४.२ | ४.७ |
| ७५ व त्यापुढे सर्व वयोगट | २.० | २.२ |
| | १०० | १०० |

स्त्रोत : (UNCATD, Handbook of Statistics 2023 : P. 63 and earlier issues)

भारतात २०१८ मध्ये ०-१४ वयोगटात २७.१ टक्के, १५-२४ वयोगटात १८.२ टक्के, २५-३९ वयोगटात २४.० टक्के, ४०-६४ वयोगटात २४.५ टक्के, ६५-७४ वयोगटात ४.२ टक्के आणि ७५ व त्यापुढील बयोगदा २.० टक्के लोकसंख्या होती.

२०२२ मध्ये ०-१४ वयोगटात २५.३ टक्के, १५-२४ वयोगटात १८.० टक्के, २५-३९ वयोगटात २४.२ टक्के, ४०-६४ वयोगटात २५.६ टक्के, ६५-७४ वयोगटात ४.७ टक्के आणि ७५ व त्यापुढील वयोगटात २.२ टक्के लोकसंख्या होती.

### १.१.४ लोकसंख्येची घनता (Density of Population) :

लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौरस किलोमीटरला पडणारे लोकसंख्येचे प्रमाण होय. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास प्रतिचौरस किलोमीटर प्रदेशात सरासरी किती लोक राहतात, त्यास लोकसंख्येची घनता म्हणतात. एकूण लोकसंख्येला एकूण जमिनीच्या क्षेत्रफळाने भागिले असता घनता समजते.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{क्षेत्रफळ (चौ. किमी. मध्ये)}}$$

कोणत्या भागात किंवा प्रदेशात लोकसंख्येची दाटी आहे किंवा लोकसंख्या विरळ आहे हे समजण्यासाठी लोकसंख्येची घनता अभ्यासणे आवश्यक असते. जमिनीचे क्षेत्रफळ कायम असते. त्यामुळे लोकसंख्येत होणाऱ्या बदलानुसार घनता बदलते. भारतात लोकसंख्येत होणाऱ्या वाढीनुसार घनता वाढत गेलेली दिसते. तक्ता १.५ मध्ये भारतातील १९६१-२०२१या काळातील लोकसंख्येच्या घनतेतील बदल दर्शविला आहे.

तक्ता १.५ : भारतातील लोकसंख्येच्या घनतेतील बदल (१९६१–२०२१)

| वर्षे | घनता |
|---|---|
| १९६१ | १५३ |
| १९७१ | १९२ |
| १९८१ | २४० |
| १९९१ | २९९ |
| २००१ | ३६३ |
| २०११ | ४२३ |
| २०२१ | ४७३ |

स्त्रोत: https://data.worldbank.org/indicator/EN.POP.DNST?locations=IN

१९६१ मध्ये लोकसंख्येची घनता १५३ होती. त्यात वाढ होऊन ती १९७१ मध्ये १९२ व १९८१ मध्ये २४० झाली. लोकसंख्येच्या घनतेत सातत्याने वाढ होऊन १९९१ मध्ये ती २९९, २००१ मध्ये ३६३ व २०११ मध्ये ४२३ झाली. २०२१ मध्ये भारतातील लोकसंख्येची घनता ४७३ होती. यावरून १९५१ ते २०२१ या काळात लोकसंख्येच्या घनतेत सातत्याने मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसते

जगातील काही देशांतील लोकसंख्येची घनता तक्ता १.६ मध्ये दिली आहे. त्यातून लोकसंख्येच्या घनतेविषयीची तुलनात्मक स्थिती स्पष्ट होईल.

तक्ता १.६ : जगातील काही देशांतील लोकसंख्येची घनता (२०२१)

| देश | लोकसंख्येची घनता |
|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ३ |
| युनायटेड स्टेटस् | ३६ |
| जपान | ३४५ |
| जर्मनी | २३८ |
| फ्रान्स | १२४ |
| बांगला देश | १३०१ |
| चीन | १५० |
| डेन्मार्क | १४६ |
| भारत | ४७३ |
| नेपाळ | २१० |
| श्रीलंका | ३५८ |
| पाकिस्तान | ३०० |

स्त्रोत: https://data.worldbank.org/indicator/EN.POP.DNST?locations=IN

तक्ता १.६ मधील लोकसंख्येच्या घनतेसंबंधीच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की लोकसंख्येच्या घनतेच्या बाबतीत देशादेशांत मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. भारतातील लोकसंख्येची घनता अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, जर्मनी, चीन, नेपाळ, पाकिस्तान या देशांतील लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. लोकसंख्येची घनता जमीन व लोकसंख्या यामधील संबंध स्पष्ट करते. लोकसंख्येची घनता नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धता व औद्योगिकरणाच्या बाबतीतील प्रगती यावर अवलंबून असते.

भारतात लोकसंख्येचा आकार मोठा आहे. तसेच लोकसंख्येची घनता अधिक आहे. भारतातील लोकसंख्येचे वितरण अत्यंत असमान आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश अशी काही राज्ये खूप दाट लोकवस्तीची आहेत. अरुणाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू व काश्मीर आणि लडाख सारख्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता कमी आहे. रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकांचे स्थलांतर होत असल्याने भारतात शहरांची वाढ होत आहे. लोकसंख्येच्या असमान वितारणामुळे मुंबई सारख्या अनेक शहरात लोकसंख्येची घनता अधिक असून तेथील लोकसंख्येच्या दाटीमुळे अनेक सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय समस्या निर्माण झालेल्या आहेत. घनता जास्त असलेल्या भागात प्रदूषणाची समस्या गंभीर स्वरूपाची आहे. हवा, जल, ध्वनी प्रदूषण वाढत आहे. तसेच या भागात वाहतूक व्यवस्थेवर ताण, वाढती गर्दी, वाहतूक कोंडी, खुल्या जागेचा अभाव, स्वच्छ पाण्याची कमतरता, साधनसामग्रीवर ताण अशाही समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत.

### १.१.५ ग्रामीण-शहरी विभागणी (Rural-Urban Distribution):

देशातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शहरीकरणात वाढ होत असते. त्यातून शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येत बाढ होते. देशातील लोकसंख्येची माहिती घेत असताना शहरी भागात लोकसंख्या किती आहे व ग्रामीण भागात ती किती आहे, याची माहिती घेणे आवश्यक ठरते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत औद्योगिकरण घडून येते. त्यातून शहरांची बाढ होते. शहरात रोजगारसंधी वाढल्याने लोकसंख्येचे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतर घडून येते. नागरी किंवा शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होणे हा आर्थिक विकासाचा निकष मानला जातो. साहजिकच भारताचा स्वातंत्र्योत्तर काळात कितपत विकास झाला आहे हे समजून घेताना लोकसंख्येची ग्रामीण व शहरी भागात होणारी विभागणी व त्यात घडून आलेले बदल यांचा अभ्यास उपयुक्त आहे. १९५१ ते २०२२ या काळात ग्रामीण व शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात कशा प्रकारे बदल झाला आहे हे तक्ता १.७ मध्ये दिले आहे

तक्ता १.७ : भारतातील ग्रामीण व शहरी लोकसंख्या (१९५१–२०२२)

(एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण)

| वर्षे | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| १९५१ | ८२.७ | १७.३ |
| १९६१ | ८२.० | १८.० |
| १९७१ | ८०.१ | १९.९ |
| १९८१ | ७६.७ | २३.३ |
| १९९१ | ७४.३ | २५.७ |
| २००१ | ७२.२ | २७.८ |
| २०११ | ६९.० | ३१.० |
| २०२१ | ६५.० | ३५.० |
| २०२२ | ६४.० | ३६.० |

स्त्रोत : १) Government of India, India 2004, P. 15.
२) https://data.worldbank.org/indicator/SP.RUR.TOTL.ZS?locations=IN

१९५१ मध्ये भारतातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ८२.७ टक्के एवढे होते. म्हणजेच १७.३ टक्के लोकसंख्या शहरात राहत होती. त्यानंतरच्या काळात सातत्यपूर्ण रीतीने शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येत वाढ व ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येत घट झाली आहे. १९५१ ते २०२२ या काळात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात ८२.७ टक्क्यांवरून ६४.० टक्क्यांपर्यंत घट झाली, तर याच काळात शहरी लोकसंख्येत १७.३ टक्क्यांवरून ३६.० टक्क्यांपर्यंत वाढ झाली. याचाच अर्थ नियोजन काळात शहरीकरणाच्या प्रक्रियेला वेग मिळून शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ झाली.